



दंगलप्रकरणी २२ अटकेत

जहांगीरपुरी परिसरात पोलिसांवर गोळीबार करणाऱ्याची ओळख पटली

म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली

दिल्लीच्या जहांगीरपुरीत हनुमान जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेवर दगडफेक झाल्यानंतर उसळलेल्या दंगलप्रकरणी पोलिसांनी आत्तापर्यंत २२ जणांना अटक केली आहे. शनिवारी संध्याकाळी झालेल्या या दंगलीत पोलिसांवरही गोळीबार करण्यात आला होता. या हल्लेखोराची ओळख पटल्याचे पोलिसांनी सोमवारी सांगितले. सोनू चिकना ऊर्फ इमाम ऊर्फ युनूस असे त्याचे नाव आहे. तो जहांगीरपुरीच्या सी ब्लॉक येथील रहिवासी आहे.

या प्रकरणी कारवाई करण्यासाठी गेलेल्या पोलिसांवर सोमवारीही दगडफेक झाली. युनूसला अटक केल्यानंतर त्याच्या पत्नीला ताब्यात घेण्यासाठी गेलेल्या पोलिसांवर सोमवारी काही घरांतून दगडफेक करण्यात आली. दिल्ली पोलिसांनी जहांगीरपुरीतील रहिवासी भंगार व्यापारी शेख हमीदला अटक केली आहे. हिंसाचारात वापरण्यात आलेल्या बाटल्या पुरविल्याची कबुली हमीदने चौकशीत दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या दंगलीतील मुख्य आरोपी अन्सार आणि अस्लमसह १४ जणांना न्यायालयीन कोठडी देण्यात आली.

जहांगीरपुरीत हनुमान जन्मोत्सवानिमित्त शनिवारी सायंकाळी काढण्यात आलेल्या शोभायात्रेवर दगडफेक झाली होती. यानंतर दोन गटांमध्ये हिंसक चकमक उडून दगडफेक आणि वाहने जाळण्याच्या घटना घडल्या. त्यात आठ पोलिसांसह ९ जण जखमी झाले. या प्रकरणी आत्तापर्यंत दोन्ही समुदायांच्या एकूण २३ जणांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून ३ देशी पिस्तुल आणि पाच तलवारी जप्त करण्यात आल्याची माहिती दिल्लीचे पोलिस आयुक्त राकेश अस्थाना यांनी सोमवारी दिली.

परिस्थिती नियंत्रणात

दिल्ली पोलिसांच्या चार न्यायवैद्यक पथकांनी घटनास्थळाची पाहणी करून सर्व प्रकारचे पुरावे गोळा केले असून सीसीटीव्ही फूटेज तसेच हिंसाचाराशी संबंधित सुमारे शंभर व्हिडीओजचे विश्लेषण करण्यात येत आहे. दंगेखोरांनी केलेल्या गोळीबारात जखमी झालेले उपनिरीक्षक मेदालाल मीणा यांची राकेश अस्थाना यांनी भेट घेतली. जहांगीरपुरीमध्ये सध्या शांतता असून नागरिकांनी अफवांकडे लक्ष देऊ नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

विहिंप नेत्यास अटक

परवानगीशिवाय शोभायात्रा काढल्याबद्दल विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलच्या आयोजकांविरुद्ध पोलिसांनी सोमवारी गुन्हे दाखल केले. या प्रकरणी विहिंपचे जिल्हा सेवाप्रमुख प्रेम शर्मा यांना अटक करण्यात आली आहे. जहांगीरपुरीतून १६ एप्रिल रोजी काढण्यात आलेल्या दोन अन्य शोभायात्रांसाठी परवानगी घेण्यात आली होती. मात्र, परवानगीशिवाय शोभायात्रा काढल्याबद्दल कलम १८८ अंतर्गत विहिंप आणि बजरंग दल दिल्ली प्रांत आयोजकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले.

अचलपूरमध्ये संचारबंदी लागू

म. टा. वृत्तसेवा, अमरावती

अमरावती जिल्ह्यात अचलपुरातील दुल्हा गेटवरील धर्मध्वज रविवारी रात्री बाराच्या सुमारास काही समाजकंटकांनी हटवल्याने दंगल उसळली. दोन गटांत हाणामारी आणि दगडफेक झाल्यानंतर पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडून दंगेखोरांवर नियंत्रण मिळवले. या पार्श्वभूमीवर सोमवारी संचारबंदी लागू करण्यात आली. पोलिसांनी भाजप कार्यकर्त्यांसह सुमारे २५ जणांवर गुन्हे दाखल करून अटक केली आहे.

खिडकी आणि दुल्हा गेट ही अचलपूर शहराची प्रवेशद्वारे म्हणून ओळखली जातात. या दरवाजांवर दरवर्षी विविध रंगांचे झेंडे लावले जातात. यंदाही सण-समारंभाच्या औचित्याने हे झेंडे लागले. एका झेंड्यावरून दोन गटांमध्ये वाद होता. हे सारे घडत असतानाच रविवारी रात्रीच्या सुमारास काही समाजकंटकांनी यातील एक झेंडा हटवला. हे लक्षात येताच लोक संतापले. याला विरोध म्हणून दुसऱ्या गटाचे लोकही उभे ठाकल्याने तणाव निर्माण झाला व त्याचे पर्यवसान दगडफेकीत झाले.

हुबळीतील हिंसाचाराची चौकशी सुरू

वृत्तसंस्था, बेंगळुरू

सोशल मीडियावरील एका पोस्टवरून कर्नाटकातील हुबळी येथे उसळलेल्या हिंसाचारप्रकरणी चौकशी सुरू आहे, असे कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी सोमवारी सांगितले.

यामागे असणाऱ्या सर्वांना, अगदी नेत्यांनाही चौकशीला सामोरे जावे लागले आणि दोषींविरोधात कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, असे बोम्मई म्हणाले. हुबळी येथे रविवारी सकाळी उसळलेल्या हिंसाचाराबाबत विचारले असता, त्यांनी हे उत्तर दिले. सोशल मीडियावरील एका पोस्टवरून जमाव हिंसक झाला. त्यांनी जुन्या हुबळी शहरातील पोलिसांची अनेक वाहने, रुग्णालय आणि हनुमान मंदिराचे नुकसान केले. यामध्ये कार्यरत असलेले काही पोलिस अधिकारी जखमी झाले.

या आक्षेपार्ह पोस्टविरोधात तक्रार दाखल केल्यानंतर एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. या कारवाईवर समाधान न झाल्याने काही लोक पोलिस ठाण्याभोवती जमा झाले, मात्र त्यांची समजूत घालून त्यांना पांगवण्यात आले. यानंतर पुन्हा पोलिस ठाण्याभोवती जमाव जमा झाला आणि त्यांनी दगडफेक केली, अशी माहिती पोलिसांनी दिली.

शब्दखेळ क्र. ८९

विजय तरवडे

१	२	३	■	४	५	६	■
७				■	८		९
	■		■	१०	■	११	
■	१२				१३		■
१४		■	■	१५		■	१६
१७		१८		■	१९		
	■		■	२०		■	
२१		■	२२		■	२३	

आडवे शब्द : १. पुढे गेलेला, प्रगती केलेला ४. ऊन ७. पंजाब व हरियानाची राजधानी ८. हिरवा ११. चित्त, अंतःकरण १२. टाळाटाळ १४. वेखंड १५. फिकीर, पर्वा १७. गजऱ्यात वापरली जाणारी फुले १९. वागणे, वागणूक २०. गमन २१. रोजच्या जमाखर्चाची वही २२. बंधू २३. मलई

शब्दखेळ ८८ चे उत्तर

आ	ब	■	शि	स्त	■	पा	व
■	या	द	वी	■	ना	व	ड
बा	णा	■	गा	डी	वा	न	■
स	■	डा	ळ	■	ज	■	ह
न	व	रा	■	ता	ले	वा	र
■	सा	डू	■	क	ला	■	हु
न	ह	र	■	■	■	खि	न्न
ग	त	■	रा	धो	भ	रा	री

उभे शब्द : १. अतिशय मोठे २. नोकर ३. अस्वस्थता ५. युद्धबंदी ६. सुगंध, सुवास ९. देह, शरीर १०. धनाढ्य १२. चणचण १३. हातचे घालवणे १४. एका संख्येतून दुसरी संख्या कमी करण्याचे गणित किंवा आकडेमोड १६. पक्ष्यांचा राजा, गरुड १८. कोथिंबीर किंवा पालेभाजीची गड्डी २०. नवऱ्याची भावजय

'विरोधकांकडून फोडाफोडीचे राजकारण'

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

भाजपचे अध्यक्ष नड्डा यांची टीका

देशातील काही भागांत झालेल्या जातीय हिंसाचाराच्या घटनांबाबत चिंता व्यक्त करणारे संयुक्त निवेदन १३ विरोधी पक्षांच्या नेत्यांनी दिले होते. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी विरोधकांच्या या कृतीवर टीका केली आहे. विरोधकांकडून समाजात फूट पाडण्याचे राजकारण केले जात असल्याचा आरोप त्यांनी सोमवारी केला.

'विरोधी पक्षनेत्यांचे निवेदन म्हणजे देशभावनेवर थेट हल्ला असून कष्टकरी नागरिकांच्या आकांक्षांनाच लगाम घातल्यासारखे आहे,' अशी टीका नड्डा यांनी केली. 'या पक्षांकडून आधी दुहीचे राजकारण करण्याचा प्रयत्न केला गेला, मात्र हे 'व्होट बँके'चे, दुहीचे राजकारण आता चालणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सर्वांना सोबत घेऊन विकासाच्या मार्गावर वाटचाल करत आहेत. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' या तत्त्वावर त्यांची मार्गक्रमणा सुरू आहे. त्यामुळे भारतीय सक्षम होत असून आणखी उत्तुंग झेप घेण्यासाठी त्यांच्या पंखांना बळ मिळते आहे,' असे नागरिकांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात नड्डा यांनी म्हटले आहे.

सामान्यांनी नाकारलेल्या आणि त्यांच्यापासून फारकत घेतलेल्या या पक्षांनी विकासाच्या राजकारणाची कास क्रूरपणे रोखली. त्यामुळे त्यांना पुन्हा मतपेढीच्या राजकारणाचा आणि दुहीच्या राजकारणाचा आसरा घ्यावा लागतो आहे,' असे नड्डा यांनी म्हटले आहे. 'आज, भारतात दोन प्रकारचे राजकारण दिसते आहे. एक राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे, जे त्यांच्या कामातून प्रतित होत आहे. तर, दुसरे अन्य राजकीय पक्षांच्या समूहाचे हीन राजकारण, जे त्यांच्या कठोर शब्दांतून दिसत आहे,' असेही ते म्हणाले.

हत्यांमागे संघ, पीएफआय कार्यकर्ते

पलक्कड (केरळ) : केरळमधील पलक्कड जिल्ह्यात नुकत्याच एकापाठोपाठ एक झालेल्या हत्यांच्या कटात पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) आणि या संघटनेची राजकीय शाखा असलेल्या सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया (सीडीपीआय), तसेच भाजप व 'आरएसएस'च्या कार्यकर्त्यांचा समावेश असल्याचे पोलिसांनी सोमवारी सांगितले.

MAHINDRA & MAHINDRA
CO-OPERATIVE CREDIT
SOCIETY LIMITED
REGN. NO. M S C S/CR/60/95
6TH FLOOR, MITC BUILDING,
AKURLI ROAD, KANDIVALI (EAST),
MUMBAI- 400 101.
PHONE NO. : 28025621/28025632
FAX NO. : 91 22 29653484

NOTICE

EXTRA ORDINARY GENERAL BODY MEETING OF MAHINDRA & MAHINDRA COOPERATIVE CREDIT SOCIETY LIMITED WILL BE HELD ON 08TH MAY, 2022 AT 10:00 A.M. AT FULCRUM CONFERENCE HALL, AUTOMOTIVE SECTOR PLANT, MAHINDRA & MAHINDRA LIMITED, AKRULI ROAD, KANDIVALI (EAST), MUMBAI – 400 101 TO ELECT MEMBERS OF THE BOARD OF DIRECTORS AS PER BYE-LAWS OF THE SOCIETY. THE DETAILED ELECTION PROGRAMME & THE PROFORMA OF NOMINATION FORMS ARE DISPLAYED ON THE NOTICE BOARD OF THE SOCIETY AT THE ABOVE ADDRESS.

Dr. Sunil Kothawale
Returning Officer,
Mumbai
13th April, 2022

प्रकाश पर्वानिमित्त मोदींचे लाल किल्ल्यावरून भाषण

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

शिखांचे गुरू तेगबहादूर यांच्या ४००व्या प्रकाश पर्वदिनी म्हणजेच, २१ एप्रिलला पंतप्रधान नरेंद्र मोदी लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशून भाषण करणार आहेत. सांस्कृतिक मंत्रालयाने सोमवारी या कार्यक्रमाबाबत प्रसारमाध्यमांना माहिती दिली.

या प्रकाश पर्वदिनाच्या औचित्याने मोदींच्या हस्ते एक विशेष नाणे आणि टपाल तिकीटही प्रकाशित करण्यात येणार आहे. ४०० रागी (शीख संगीतकार) या निमित्ताने शबद कीर्तन सादर करणार आहेत.

हा कार्यक्रम दिल्ली शीख गुरुद्वार व्यवस्थापन समितीच्या सहयोगाने व सांस्कृतिक मंत्रालयातर्फे आयोजित करण्यात येणार आहे. या सोहळ्यात अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आणि देश-विदेशांतील महत्त्वाच्या व्यक्ती सहभागी होणार आहेत, असे या मंत्रालयाकडून सांगण्यात आले. 'स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव' या उपक्रमाचा एक भाग म्हणून हा कार्यक्रम होत आहे.

खादी आणि ग्रामोद्योग आयोग
Ministry of MSME (Govt. of India)
सी.बी.कोरा इंस्टीट्यूट, शिंपोली गाव, म्युनसिपल शाळेसमोर, बोरीवली (पश्चिम)
बेकींग कोर्स
गव्हर्मेंट सर्टिफाईड दि. २१ एप्रिल पासून
केक, कुकीज, ब्राऊनिज, पफ,
कपकेक, डेझर्ट, ब्रेडस् इ. व्यवसाय मार्गदर्शन
सुसज्ज एसी क्लासरुम
स्थळ : एम.जी. रोड, गोरेगाव पश्चिम
संपर्क : शेफ रिया कामत
9699563599/9820563599
कालावधी १० दिवस २५ लाखाची कर्ज योजना सबसीडी सहीत.

BLUE DART
EXPRESS LIMITED
Regd. Office: Blue Dart Centre, Sahar Airport Road, Andheri (E), Mumbai 400 099. **Tel:** 022-28396444 **Fax:** 022-28244131
CIN: L61074MH1991PLC061074
Email: communications@bluedart.com **Website:** www.bluedart.com

NOTICE

NOTICE is hereby given pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 that the Meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Thursday, May 5, 2022 at 3.45 p.m., inter-alia to approve the Audited Financial Results for the quarter and year ended March 31, 2022 (Standalone and Consolidated) and consideration of Final Dividend, if any, on the Equity Shares for the year ended March 31, 2022.

In terms of the Code of Conduct for Prevention of Insider Trading in Securities of Blue Dart Express Limited, the Trading window would continue to remain closed from April 1, 2022 to May 7, 2022. The said notice may be accessed on the Company's website at www.bluedart.com and also on the stock exchanges websites at www.bseindia.com and www.nseindia.com.

for Blue Dart Express Limited
Sd/-
Tushar Gunderia
Sr. Vice President
Head (Legal & Compliance) &
Company Secretary

Place: Mumbai
Date: April 15, 2022

थोडक्यात

प्रफुल्ल कार यांचे निधन

भुवनेश्वर : ओडिशाचे प्रख्यात गायक-संगीतकार प्रफुल्ल कार यांचे सोमवारी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी मनोरमा आणि मुले आहेत. पुरी येथे जन्मलेल्या कार यांनी अनेक गाणी लिहिली, गायली आणि स्तंभलेखनही केले. 'कमला देशा राजकुमारा'सह त्यांची असंख्य गीते लोकप्रिय झाली. त्यांना २०१५मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच, त्यांना आठवेळा राष्ट्रीय पुरस्कार आणि २००४मध्ये जयदेव पुरस्कार मिळाला होता. पारंपरिक ओडिया गाण्यांचा दुर्मीळ संग्रह ओडिया भागवत आणि ओडिया छंदांचे ध्वनिमुद्रण करणारे संगीतकार म्हणून त्यांची ओळख आहे.

शाळांची दुर्दशा

नवी दिल्ली : गुजरातमधील काही शाळांची दुर्दशा झाली आहे, असे ट्वीट दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनी सोमवारी केले. वर्गात जमिनीवर बसून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा फोटो ट्विटरवर पोस्ट करत, 'अनेक शाळांमध्ये बाके किंवा स्वच्छतागृहेही नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. गुजरातचे शिक्षणमंत्री जितू वाघानी यांच्या मतदारसंघातील सरकारी शाळांना त्यांनी भेट दिली होती.

हवाई अधिभार : गोवा मार्गे १ रुपया, इंदूर, चेन्नई मार्गे ३ रुपये, अहमदाबाद, बंगलोर, कोची, कोइम्बतूर, एर्नाकुलम, हैदराबाद, कोझिकोड, मंगळूर, त्रिवेंद्रम, उदयपूर, विझागमार्गे ४ रुपये, दिल्ली, कोलकाता मार्गे ५ रुपये. रस्ते अधिभार : रु. २.०० (बलसाड जिल्हा, सिल्वासा, दमण, इंदौर ही शहरे वगळून.) बेनेट, कोलमन अँड कंपनी लि.च्या वतीने आर. कृष्णमूर्ती, यांनी टाइम्स ऑफ इंडिया इमारत, डॉ. डी. एन. रोड, मुंबई - ४०० ००१ येथे प्रकाशित केले व १) द टाइम्स ऑफ इंडिया सबर्बन प्रेस, आकुर्ली रोड, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, कांदिवली (पू), मुंबई - ४०० १०१, फोन (०२२) २८८७२३२४, २८८७२९३०, फॅक्स - (०२२) २८८७४२३०. २) द टाइम्स ऑफ इंडिया प्रिंट सिटी, प्लॉट नं. ४, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, ठाणे-बेलापूर रोड, ऐरोली, नवी मुंबई-४००७०८. फोन (०२२) २७६०९९९९, फॅक्स - (०२२) २७६०५२७५ येथे मुद्रित केले. © सर्वाधिकार सुरक्षित, प्रकाशकांच्या लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनर्प्रकाशनास बंदी. **संपादक : पराग करंदीकर, निवासी संपादक - श्रीकांत बोजेवार* (मुंबई आवृत्ती)** (*पीआरबी कायद्यानुसार बातम्यांच्या निवडीसाठी जबाबदार) नोंदणी क्र. एमसीएस/०६३/२०१५-१७. आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ९२४९/६२.

Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१
दूरध्वनी: +९१-२२-३५५५ ५००० • फॅक्स: +९१-२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

सूचना

(कंपनीच्या इक्विटी भागधारकांसाठी)

विषय: कंपनीच्या इक्विटी समभागांचे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरणात हस्तांतरण

गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (लेखा, लेखापरिक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियम, २०१६, सुधारणा केलेल्या (''नियम'') मधील तरतुदींनुसार ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

इतर मुद्यांसोबत वरील नियमांमध्ये ज्या भागधारकांच्या लाभांशांचे सलग सात किंवा अधिक वर्ष वितरण होऊ शकलेले नाही किंवा ज्याचा दावा करण्यात आलेला नाही अशा सर्व समभागांचे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी (''आयईपीएफ'') प्राधिकरणाकडे हस्तांतरण करण्याबाबत तरतूद आहे.

नियमांतील विविध आवश्यकतांचे पालन करताना कंपनीने आर्थिक वर्ष २०१३–१४ किंवा तत्पूर्वीच्या ओळीने सात किंवा अधिक वर्षांच्या कालावधीसाठी लाभांशाचे पैसे न देण्यात आलेल्या किंवा दावा न केलेल्या सर्व समभागांचे त्यांच्या संबंधित देय तारखांना आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरण केले आहे. कंपनीने, आर्थिक वर्ष २०२२–२३ मध्ये आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करण्यात येणाऱ्या समभागांच्या संबंधित, योग्य कार्यवाही करण्यासाठी, दिनांक १३ एप्रिल, २०२२ च्या पत्राद्वारे व्यक्तिगतरित्या संबंधित भागधारकांना कळविले आहे.

कंपनीने आपल्या वेबसाईटवर **www.ril.com** आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र असलेल्या समभागांचा व सदर भागधारकांचा तपशिल उपलब्ध केला आहे. भागधारकांना **https://www.ril.com/InvestorRelations/ShareholdersInformation.aspx** ही वेब–लिंक पाहण्याची आणि त्यामधील न मिळालेल्या लाभांशाच्या तपशिलाची व आयईपीएफ प्राधिकरणात हस्तांतरित होण्यास पात्र समभागांची पडताळणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.

भागधारकांनी याची नोंद घ्यावी की नियमांनुसार कार्यवाही पूर्ण करून, भागधारक दावा न केलेला लाभांश व समभाग, दोन्ही जे आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहेत, सदर समभागांवर जमा सर्व लाभांसह, काही असल्यास, आयईपीएफ प्राधिकरणाकडे पुन्हा दावा करू शकतील.

प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणारे आणि ज्यांचे समभाग आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र आहेत अशा संबंधित भागधारकांनी कृपया याची नोंद घ्यावी की, त्यांच्यापाशी असलेल्या मूळ समभाग प्रमाणपत्राऐवजी कंपनी नियमांनुसार डिमटेरियलाइज करण्यासाठी आणि आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यासाठी सदर समभाग प्रमाणपत्रांची नविन प्रत जारी करेल आणि अशा प्रकारे सदर प्रमाणपत्र जारी केल्यानंतर, त्यांच्या नावे नोंदणी करण्यात आलेले मूळ समभाग प्रमाणपत्र आपोआप रद्द होईल आणि त्याद्वारे कोणताही व्यवहार करता येणार नाही. भागधारकांनी ह्याची देखील नोंद घ्यावी की, कंपनीच्या वेबसाईटवर कंपनीने उपलब्ध केलेला भागधारकांचा तपशिल हा ह्या नियमांतर्गत आयईपीएफ प्राधिकरणाकडे समभाग हस्तांतरित करण्यासाठी कंपनीद्वारा जारी करण्यात येणाऱ्या समभाग प्रमाणपत्रांच्या नविन प्रतींसाठीची योग्य सूचना आहे.

कंपनीला संबंधित भागधारकाकडून १८ जुलै, २०२२ रोजी किंवा तत्पुर्वी कोणतेही उत्तर (दावा न केलेल्या/वसूल न केलेल्या लाभांशाचा दावा करण्यासंदर्भात) न मिळाल्यास, नियमांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या पद्धतींनुसार कॉर्पोरेट कार्यवाहीद्वारे कंपनी नियमांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी समभाग डिमटिरिअलाईजकरून ते आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करेल.

भागधारकांना या संदर्भात आणि नियमांविषयी काही शंका असल्यास, त्यानी श्री. एस्. पी. वेणुगोपाल, उपाध्यक्ष, **केफिन टेक्नॉलॉजीस् लिमिटेड,** कंपनीचे रजिस्ट्रार्स आणि ट्रान्सफर एजंट्स यांच्याशी पत्ता: सेलेनियम टॉवर बी, प्लॉट नं. ३१–३२, गचीबोवली, फायनानशियल डिस्ट्रीक्ट, नानक्रमगुडा, हैद्राबाद – ५०० ०३२, दूरध्वनी: + ९१–४०–६७१६ १७०८, फॅक्स: + ९१–४०–६७१६ १६८०, टोल फ्री क्र: १८००–३०९–८९९८ (सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००), ई–मेल: **rilinvestor@kfintech.com,** वेबसाईट: **www.kfintech.com** येथे संपर्क साधावा.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
सही/–
सावित्री पारेख
कंपनी सेक्रेटरी
आणि कंप्लायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : १८ एप्रिल, २०२२

www.ril.com

१२ मार्च, २०२२ रोजी झालेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये एकूण १७,५१,३३५ प्रकरणे निकाली

राष्ट्रीय लोक अदालत
शनिवार दिनांक ७ मे, २०२२

सामंजस्य आणि तडजोडीने जीवन सुखी बनवूया,
चला आपण लोकन्यायालयाच्या मार्गाने जाऊया.

प्रलंबित तसेच दाखलपूर्व वाद प्रकरणे सामंजस्याने मिटविण्याकरीता महाराष्ट्रातील उच्च न्यायालय व त्यांची सर्व खंडपीठे, सर्व जिल्हा व तालुका न्यायालये व न्यायाधिकरणे येथे राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या आदेशान्वये **'राष्ट्रीय लोक अदालतीचे'** आयोजन नियमितपणे करण्यात येते. **त्यानुसार येत्या राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन दिनांक ७ मे, २०२२ रोजी केले आहे.**

❖ लोक अदालतीचे फायदे

- वाद प्रकरणांचा झटपट निकाल लागतो. तोंडी पुरावा-उलटतपासणी-दीर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात.
- लोकन्यायालयाच्या निवाड्याविरुध्द अपील नाही. एकाच निर्णयात न्यायालयीन प्रक्रीयेतून कायमची सुटका होते.
- लोकन्यायालयात होणारा निवाडा हा आपापसात समजूतीने होत असल्याने सर्व पक्षाचा विजय होतो.
- लोकन्यायालयाचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो.

लोक अदालत का है ये नारा,
दोनो जीते, ना कोई हारा ।

- परस्पर समतोने मिटतात होत असल्याने एकमेकातील द्वेष वाढत नाही व कटूताही निर्माण होत नाही.
- न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणेच लोकन्यायालयात होणाऱ्या निवाड्याची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येते. (Award of Lok Adalat is deemed Decree)
- वेळ आणि पैसा दोघांचीही बचत होते.
- लोकन्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणांमध्ये कायदयानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते.

❖ राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ठेवण्यात येणारी प्रकरणे

- सर्व प्रकारची दिवाणी प्रकरणे (Civil Cases)
- चेक बाउन्स प्रकरणे (Cases u/s.138 N.I. Act)
- बँक वसुली प्रकरणे (Bank Recovery Cases)
- अपघात न्यायाधिकरणाबाबतची प्रकरणे (Motor Accident Cases)
- कामगार वाद प्रकरणे (Labour Disputes Cases)
- वीज, पाणी व कर यांच्या देयकाबाबतची प्रकरणे (Electricity, Water Bills & Taxes)
- वैवाहिक वादाबाबतची प्रकरणे (Matrimonial Disputes Cases)
- नोकरी बाबतची प्रकरणे ज्यात पगार, इतर भत्ते व निवृत्तीबाबतचे फायदे (Service Matters relating to Pay and Allowances & Retirement Benefits)
- महसुल बाबतची प्रकरणे (Revenue Cases)
- ग्राहक तक्रार निवारण आयोगासमोरील प्रकरणे (Cases pending before Consumer Redressal Commission)

उच्च न्यायालयात आयोजित केल्या जाणाऱ्या लोक अदालतीची माहिती मुंबई येथे उच्च न्यायालय विधी सेवा समिती, १०५, पी.डब्ल्यू.डी. इमारत, उच्च न्यायालय, फोर्ट, मुंबई येथे तर नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठांसाठी त्या त्या ठिकाणच्या उच्च न्यायालय विधी सेवा उपसमितीकडे मिळेल. जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये होणाऱ्या लोक अदालतीची माहिती त्या त्या जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये कार्यरत असलेल्या जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व तालुका विधी सेवा समित्यांच्या कार्यालयांकडून मिळेल.

सदस्य सचिव
महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई

१०५, पी.डब्ल्यू.डी. इमारत, उच्च न्यायालय, फोर्ट, मुंबई
☎ ०२२-२२६९१३५८/२२६९१३३५
टोल फ्री : १८००२२२३२४/१५१००
८५९१९०३६०१ :mslsa-bhc@nic.in
legalservices.maharashtra.gov.in

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, संपर्क क्रमांक : मुंबई-८५९१९०३६०१, मुंबई उपनगर-८५९१९०३६०२, रायगड-८५९१९०३६०६, ठाणे-८५९१९०३६०४, रत्नागिरी-८५९१९०३६०८, सिंधुदूर्ग-८५९१९०३६०७